गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या कार्यक्रमा अंतर्गत गाळ काढण्याकरीता खाजगी व्यक्ती, अशासकीय संस्था , ग्राम पंचायत यांनी यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यास त्यांना द्यावयाचे इंधनाचे दर निश्चित करणेबाबत..

# महाराष्ट्र शासन

## जलसंधारण विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः गामुध-२०१७/प्र.क्र.६२/जल-८**

मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: २५ मे, २०१७.

पहा - १) **शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :** जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४

२) **शासन परिपत्रक , ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :** मफुअ-२०१६/प्र.क्र.६८/जल-८, दिनांक ४ मे, २०१६

३) **शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :** गामुध-२०१७/प्र.क्र.१३४/जल-१, दिनांक ६ मे, २०१७

**परिपत्रक -**

राज्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान ही योजना सन २०१५-१६ पासून राबविण्यात येत असून या संदर्भात विस्तृत सुचना उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक (१) येथील दि.४/१२/२०१४ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये निर्गमित केलेल्या आहेत. सदर कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी तसेच तत्सम इतर कार्यक्रमांमध्ये अशासकीय संस्थांचा सहभाग घेण्या संदर्भात जलसंधारणाच्या तसेच मृदसंधारणाच्या कामांबाबत अशासकीय संस्था यांना डिझेल (इंधन) करीता निधी देण्याबाबत सुचना उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक(२) येथील ४ मे, २०१६ रोजीच्या शासन परिपत्रकाअन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. आता राज्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली असून या बाबत तपशीलवार सूचना शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :गामुध-२०१७/प्र.क्र.१३४/जल-१, दिनांक ६ मे, २०१७ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे या योजने अंतर्गत इंधनाकरिता निधी वितरणाबाबतची कार्यपध्दती सर्व जिल्हाधिकारी/ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शासनाच्या दिनांक १६ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे. या योजनेखाली खाजगी व्यक्ती /अशासकीय संस्था किंवा ग्राम पंचायती यांनी गाळ काढण्याकरिता यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिल्यास त्यांना इंधनाची रक्कम कोणत्या दराने अदा करावयाची याबाबत सूचना निर्गिमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजने अंतर्गत खाजगी व्यक्ती /अशासकीय संस्था किंवा ग्राम पंचायती यांनी गाळ काढण्याकरिता यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिल्यास त्यांना अदा करावयाच्या इंधनाच्या दराबाबत मुख्य अभियंता, यांत्रिकी विभाग, नाशिक (जलसंपदा विभाग) यांचे कडून यंत्राचा/ मशीनचा प्रकारानुसार निश्चित करण्यात आलेल्या प्रती घन मिटर गाळाकरिताचे दर दर्शविणारे विवरणपत्र या शासन निर्णयासोबत परिशिष्ट " अ" नुसार जोडण्यात येत आहे. सर्व जिल्हाधिकारी यांनी सदर दरा नुसार इंधनाची देयके अदा करावित. स्थानिक परिस्थिती नुसार या दरापेक्षा जास्त दर मागणी असल्यास जिल्हाधिकारी यांनी या संदर्भात दर पृथकरण (Rate Analysis) व कार्य अभ्यास (Work Study) करून सदर दरामध्ये काही बदल होत असल्यास अशा दरांना उपरोक्त संदर्भीत क्र.(१) येथील शासन निर्णय अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हा कार्यकारी समितीची मान्यता घेऊन विभागिय समितीच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करावी.

२. सदर दर हे काळीमाती व मऊ मुरुम याकरिता निश्चित केलेले आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५२५१६५६५८५२२६ असा आहे. हे परिपत्रक निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shankar Trambak Jadhav

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD and Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cccfd79237cd08ae181b91f021d984be73c43b0223 4d4c07b7da787cf666bc54, cn=Shankar Trambak Jadhav
Date: 2017.05.25 17:14:41 +05'30'

**(शं.त्र्यं.जाधव)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रती,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव महाराष्ट्र विधानमंडळ मुंबई
४. सर्व सन्माननिय संसद सदस्य व विधानसभा / विधानपरिषद
५. मा. मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
७. मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे.
९. मुख्य सचिव यांचे सचिव,

१०. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. आयुक्त (कृषि) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा.
१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा
१६. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१७. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण संस्था, पुणे,
१८. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे
१९. मुख्य अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे
२०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२१. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
२२. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
२३. कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी/कुलगुरु पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
२४. कुलगुरु, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२५. सर्व जिल्हाधिकारी,
२६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, /सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२७. सर्व सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
२८. सर्व सहसंचालक, (सामाजिक वनीकरण ),
२९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
३०. सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे,(स्थानिक स्तर)
३१. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क,मुंबई (प्रसिध्दी)
३२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
३३. सर्व मुख्य वन संरक्षक व उप महासंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते,
३४. सर्व मुख्य वनसंरक्षक, / सर्व उपवनसंरक्षक,
३५. सर्व उपसंचालक,सामाजिक वनीकरण.
३६. सर्व उपायुक्त (विकास),
३७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३८. महालेखापाल -१/२, महाराष्ट्र राज्य ,मुंबई/नागपूर ( लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता )
३९. अप्पर संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कक्ष,

४०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई. निवासी लेखापरीक्षा, अधिकारी, मुंबई.
४१. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
४२. नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई
४३. सर्व अशासकीय सदस्य महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद.
४४. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
४५. जल-८ (निवडनस्ती) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई